## इंडिया फाऊंडेशन फॉर द आर्टस् (आयएफए)

## त्यांच्या आर्टस् प्रॅक्टिस कार्यक्रमांतर्गत

## **Productions**

## प्रकल्पांसाठी प्रस्ताव मागवत आहे

### अर्ज पाठवायची अंतिम तारीख: जुलै ५, २०२४ **(July 05, 2024)**

आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रम अशा प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करतो जिथे कलाकार त्यांची कला नवीन पद्धतींनी वाढवायचा प्रयत्न करतात. यात रूढ संकल्पनांना आव्हान देणे असू शकते, कलानिर्मितीच्या सीमा रुंदावणे असू शकते, सादरीकरणातील नावीन्य असू शकते, स्थळ आणि प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्याचा नवीन मार्ग असू शकते, एकंदरीत प्रयोगशीलतेला प्राध्यान्य देणारे असे काहीतरी असू शकते.

निर्मिती **(Productions)**:

कलाकारांना, त्यांच्या नियत फ्रेमवर्कला आव्हान द्यावेसे वाटते, कला सादरीकरणासाठी नवीन शक्यतांचा शोध घ्यावासा वाटतो आणि त्यांच्या कलेचा नव्याने धुंडाळा घ्यावासा वाटतो तेव्हां ते स्वत:च्या, कलात्मक प्रवासाच्या एका टप्प्यावर पोहोचले असे समजायला हरकत नाही. असा शोध कुतूहल आणि प्रयोगशीलतेच्या रूपात प्रकट होऊ शकतो.
कलाकारांना जेव्हा त्यांच्याकडून ग्रहण केलेल्या रचनेसंदर्भात विचार करणे किंवा कलात्मक काम तयार करण्याच्या नवीन संभावनांचे शोध घेणे आणि त्यांच्या कलेचा नव्याने धुंडाळा घ्यावासा वाटतो तेव्हां ते आपल्या कलात्मक यात्रेत त्यांच्या स्वत:च्या कलात्मक मार्गाचा पुनर्विचार करू इच्छितात असे समजायला हरकत नाही. असा शोध कुतूहल आणि प्रयोगशीलतेच्या रूपात प्रकट होऊ शकतो.

आर्टस् प्रॅक्टिस कार्यक्रमांतर्गत, आम्ही निर्मितीसाठी असे प्रस्ताव मागवतो आहोत जे सर्जनशीलतेचा मागोवा घेतात. प्रस्तावांमध्ये प्रयोग, ध्वनी, व्हिज्युअल आर्ट्स, डिजिटल निर्मिती, साहित्य किंवा या घटकांना एकत्रित करणारे आंतरशाखीय कार्य यासारख्या विविध प्रकारांचा समावेश असू शकतो. आम्ही माहितीपट किंवा काल्पनिक चित्रपट निर्मितीच्यापेक्षा जास्त काहीतरी करून दाखविणाऱ्या प्रस्तावांना प्रोत्साहन देत आहोत आणि थिएटर, नृत्य आणि संगीत सादरीकरण, प्रदर्शन, पुस्तके किंवा मासिके यांसारखी प्रकाशने, मूव्हिंग इमेज प्रेझेंटेशन, गेम, डिजिटल कलाकृती आणि इतर कोणत्याही नाविन्यपूर्ण स्वरूपाच्या प्रस्तावांचे स्वागत करतो ज्याची अजून कोणी कल्पनाही केली नाहीये.

प्रकल्पाचा कालावधी: कमाल 18 महिने

एकूण खर्च (बजेट): जास्तीतजास्त रुपये **5,00,000/-** (तुम्ही प्रस्तावित बजेटच्या, जास्तीतजास्त, 35% इतक्या रकमेची, मानधनासाठी विनंती करू शकता.)

अंतिम तारीख: July 05, 2024

अर्ज कोण पाठवू शकतात?

आम्ही विविध कलाप्रांतात काम करणाऱ्या कला उपासकांकडून प्रस्ताव आमंत्रित करतो आहोत. ज्यांत पुढील कलाप्रांतांचा समावेश असू शकतो:

- संगीत, ध्वनी, लेखन, नृत्य, चळवळ, थिएटर, बोलक्या भावल्या, कथाकथन, जादू, सर्कस आणि इतर परफॉर्मन्स कलांमध्ये काम करणारे कलाकार
- चित्रपट (माहितीपट आणि कथेवर आधारित), अॅनिमेशन, छायाचित्रकार, प्रदर्शननिर्माते, नवमाध्यम हाताळणारे, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), यांत्रिकनिर्मिती (robotics), संवादात्मक कलाप्रकार, खेळ, चित्रकला, शिल्पकला, printmaking, कॉमिक्स आणि इतर दृश्यकला प्रकारातील कलाकार.
- संग्राहक (Curators), विशेषकरून जे संग्रहालयाच्याऐवजी इतरत्र बाहेर कार्यरत आहेत ते.
- साहित्याशी निगडीत कवि, कादंबरीकार, नाटककार
- निरनिराळ्या कलाप्रांतात एकत्रितपणे काम करणारे कलाकार

पात्रता:

प्रस्ताव पाठवायची पात्रता भारतीय नागरिकत्व ही आहे. तुमचे प्रस्तावित सहकारीसुद्धा भारतीय नागरिक असणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी, इथे क्लिक करा.

प्रस्तावाचे तपशील:

पत्ता, फोन नंबर आणि इमेल आयडी यासह तुमचा बायोडाटा आणि खालील बाबींसह प्रस्ताव:

- तुमचे सध्याचे कलाक्षेत्र, त्यांत कलाकार म्हणून तुम्हाला असणारे प्रश्न आणि तुम्हाला असणारे स्वारस्य.
- तुम्हाला अपेक्षित असणाऱ्या निर्मितीचे तपशील आणि त्यांची कारणे.
- तपशीलवार वेळापत्रक आणि खर्चाचे तपशील.
- तुम्ही आधी केलेल्या कामाचे तपशील.

प्रस्तावासंदर्भात:

- तुम्ही तुमचा प्रस्ताव कोणत्याही भारतीय भाषेत किंवा इंग्लिशमधे लिहू शकता. आयएफए इंग्लिशव्यतिरिक्त इंग्रजीव्यतिरिक्त भारतीय भाषांमधे लिहिल्या जाणाऱ्या प्रकल्पांना कायम प्रोत्साहित करते.
- तुमचा प्रस्ताव पाठवण्यापूर्वी प्रकल्पाच्या कल्पना/प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी, कृपया mridupankhi@indiaifa.org येथे **June 21, 2024** च्या पूर्वी लिहा.
- तुम्ही तुमचा अंतिम अर्ज, 25 एमबी पर्यंतच्या, एकाच इमेलद्वारे, mridupankhi@indiaifa.org इथे **July 05, 2024**. अथवा त्यापूर्वी पाठवू शकता.

कृपया लक्षात घ्या की अपूर्ण प्रस्ताव आणि अपात्र अर्जदारांकडून आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

## निवड प्रक्रिया:

निवडक प्रस्ताव एका बाह्य समितीद्वारे तपासली जातील आणि अर्जदारांना या समितीसमोर त्यांच्या प्रकल्पाच्या संकल्पना सादर कराव्या लागतील. निवड झालेल्या प्रकल्पांची यादी **September 2024** मधे जाहीर करण्यात येईल.

निवड झालेले सगळे प्रकल्प आयएफएद्वारे चालविले जातील.

कृपया लक्षात घ्या आयएफए एक असे सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे जे मुलांसह प्रत्येकाला समर्थन देते, त्यांचा आदर करते आणि त्यांना संरक्षण देते. प्रत्येक अर्जदाराने हे ध्यानात ठेवले पाहिजे आणि या संकल्पनेशी कायम इमान राखले पाहिजे.